MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



## बीडच्या पोलीस अधिक्षकपदी अविनाश बारगळ यांची नियुक्ती

बीड(प्रतिनिधी)

पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या जागी अविनाश बारगळ अमरावतीवरून येतं आहेत. बारगळ यांची अमरावतीतील कारकीर्द राज्यात चर्चेत राहणारी ठरलेली होती. नंदकुमार ठाकूर यांची बदली झाली असली तरी त्यांना नवीन ठिकाणी अजून नियुक्ती मिळालेली नाही.

बीडमध्ये नंदकुमार ठाकूर यांनी दोन वर्ष सेवा बजावल्यानंतर विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने त्यांची बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी अविनाश बारगळ बीडला येतं आहेत. बारगळ यांनी अमरावतीमध्ये चार वेळा पोलीस विभागात सेवा बजावली आहे. अतिरिक्त पोलिस अधिक्षक त्यानंतर पोलिस उपायुक्त म्हणून अमरावती शहरात त्यांनी कार्यकाळ उपभोगल्यानंतर अमरावती पोलीस अधिक्षक आणि नंतर पुन्हा अमरावतीमध्येच सीआयडीचे अधीक्षक म्हणून गृहविभागाने त्यांना काम करण्याची संधी दिली होती.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -३१६ | गुरूवार दि.०८ ऑगस्ट २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -316 | THURSDAY DT.08 AUGUST 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# आमदार बाळासाहेब आजबेंच्या कपाळी गद्दारीचा शिक्का आष्टीतून बसणार धक्का





- शरद पवारांच्या राष्ट्रवादीतून निवडून येत अजित पवारांच्या राष्ट्रवादीसोबत महायुतीमध्ये गेलेले आमदार बाळासाहेब आजबे
  बाळासाहेब आजबे शून्य कर्तव्य असलेला आमदार?
  बाळासाहेब आजबेनी गुत्तदारांना पोसण्यासाठी आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघात कित्येक गावात बोगस कामं?
  खासदार बजरंग सोनवणे यांना आमदार बाळासाहेब आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर लीड आहे.
- बाळासाहेब आजबे यांनी आमदार म्हणून नेमकी कोणती जबाबदारी पार पाडली
  भीमराव धोंडे यांनी केलेल्या कामाचा श्रेय आजबे घेतात?
  महायुतीच्या सरकारमध्ये अजित पवार गटाचे आमदार म्हणून बाळासाहेब आजबे सामील झाले खरे पण सुरेश धस भीमराव धोंडे यांचे पारडे जड?
  आष्टी पाटोदा मतदारसंघात अनेक ठिकाणी बोगसगिरी गुत्तेदार आमदार म्हणून बाळासाहेब आजबे यांची ओळख डोकेदुखी ठरणार.

बीड /प्रतिनिधी

गद्दारीचा शिक्का कपाळी घेऊन बाळासाहेब आजबे नेमकं कोणत्या तोंडाने आष्टी पाडोदा शिरूर मतदार संघात फिरणार आहेत हा प्रश्न आता सामान्य जनतेला पडला असून त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये सध्याच्या परिस्थितीमध्ये चर्चा जोर धरत आहे. काही दिवसांपूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री

अजित पवार यांनी आज मीडियाशी संवाद साधला. यावेळी त्यांनी महायुतीची जागा वाटपाची प्राथमिक चर्चा झाल्याचं सांगितलं. साधारणपणे सिटींग जागा ज्यांना त्यांना राहाव्यात अशी प्राथमिक चर्चा झाली आहे. पण त्यात काही जागांची अदलाबदल होणार आहे. आता एखादा सिटिंग आमदार असेल. पण त्याच्या तुलनेत दुसऱ्या पक्षाकडे तुल्यबळ उमेदवार असेल तर ती जागा दुसऱ्या पक्षाने लढवायची, असं आमचं ठरलं आहे. पण ज्या उमेदवाराला ही जागा दिली जाणार आहे, तो तुल्यबळ असावा. त्याची निवडून येण्याची क्षमता असावी हे आम्ही पाहणार आहोत. याबाबतच आमच्या तिन्ही पक्षांचं एकमत झालं आहे, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे. म्हणजे या निवडणुकीत महायुतीत सिटिंग उमेदवारांची जागा जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे विद्यमान आमदारांना टेन्शन येणार असल्याचं बोललं जात आहे.

दरम्यान या निर्णयाचा पहिला फटका आष्टी विधानसभा मतदार संघाचे अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे यांना बसणार असल्याचे महायुतीच्या जागा वाटपाच्या तडजोडीवरुन दिसून येऊ लागले आहे.

लोकसभेच्या निवडणुक प्रचारा दरम्यान भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जामखेड येथील प्रचार सभेत सुरेश धस हेच आष्टी मतदार संघाचे उमेदवार असतील अशी घोषणा केली होती. त्यामुळे महायुतीच्या जागा वाटपात राष्ट्रवादीची जागा भाजपच्या कोठ्यात जाणार हे आता स्पश्ट झाले आहे. तसेच या मतदार संघात भाजपकडून विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी सुरेश धस यांच्यासह माजी आमदार भीमराव धोंडे हेही इच्छुक असल्याने उमेदवारी मिळविण्यासाठी धस धोंडे यांच्यात रस्सीखेच सुरू आहे. विशेष म्हणजे भाजपचें दोन्ही उमेदवार तुल्यबळ आणि आपली व्होट बँक असणारे आहेत.

### नवीन चेहऱ्यांना संधी देणार

**महायुतीच्या जागा वाटपाचा फटका आष्टीचे राष्ट्रवादीचे आमदार बाळासाहेब आजबेना बसणार?**

**सिटिंग आमदार असला तरी ज्याच्याकडे तुल्यबळ उमेदवार असेल तर ती जागा दुसऱ्या पक्षाने लढवायची**

**अजितदादांनी स्पष्टच सांगून टाकले काही दिवसांपूर्वी काही दिवसांपूर्वी सांगितले आहे**

अजितदादा यांनी आम्हीही तरुणांना संधी देणार असल्याचं स्पष्ट केलं. आमच्या पक्षात अनेक तरुण आहेत. कितीतरी तरुणांची नावे मी सांगू शकतो. आता आम्ही निर्णय घेताना काही सिटिंग आणि नव्या जागांच्या ठिकाणी नवे चेहरे देणार आहोत. मीही युवाशक्तीला संधी देण्याचं काम करत आहे. मी तरुणपणी खासदार झालो, तेव्हापासून आतापर्यंत मी तरुणांना संधी देत आलो आहे. आताही तुम्ही पाहिलं असेल आम्हाला ज्या जागा मिळाल्या त्यात आम्ही अनिल भाईदास पाटील आणि आदिती तटकरे आदी नवे चेहरे दिले. आम्ही सर्व समाजाला संधी देत आहोत, असं अजितदादांनी स्पष्ट केलं.

आष्टी पाटोदा शिरूर चे आमदार बाळासाहेब आजबे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेश्वर शरद पवार अजित पवार एकत्र असताना उमेदवारी देत आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातून निवडून आणले खरे परंतु जेव्हा अजित पवार यांनी सत्तेतून बाहेर पडत तत्कालीन उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना बाळासाहेब आजबेनी अजित पवार गटामध्ये आपला घरोबा करून महायुतीच्या सत्तेच्या पाठीशी उभा राहण्यासाठी अजित पवारांना साथ दिली त्यावेळेस शिवसेनेसह शरद पवारांच्या राष्ट्रवादी मध्ये मोठी फूट पडली या फुटीने दोन्ही पक्ष महाराष्ट्र मध्ये घायाळ झाले असताना लोकांमध्ये त्यांच्या भावना जास्त प्रमाणात व्यक्त होत असताना आष्टी पाटोद्याचे आमदार व शिवसेनेचे आमदारांना गद्दारीचा शिक्का कपाळी घ्यावा लागला परंतु सत्तेमध्ये गेल्यानंतर आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघांमध्ये मला तेवढा निधी आला परंतु गुत्तेदारांच्या घशामध्ये विद्यमान आमदार असलेले बाळासाहेब आजबे देत त्या ठिकाणी आपले कार्यकर्ते व गुत्तेदार टक्केवारीत उन्हाळ्याचे काम केले जनतेच्या पिण्याचे पाण्याची प्रश्न असतील किंवा रस्त्याचे प्रश्न असतील शेतकऱ्यांचे प्रश्न असतील यासाठी कधीही रस्त्यावर न उतरणार आमदार म्हणजे बाळासाहेब आजबे आहे गद्दारीचा शिक्का आणि मतदारसंघांमध्ये असंख्य कामाचा ढिगारा घेऊन आता मतदारांमध्ये कोणत्या तोंडाने जातील हा प्रश्न यावेळी पडला आहे बाळासाहेब आजबे च्या जवळच्या काही व निष्ठावाना न्याय न मिळाल्यामुळे निष्ठावंत हे दूर होणे आहेत गद्दारीचा शिक्का आणि शून्य कर्तव्य असलेले आमदार बाळासाहेब आजबेंना आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील यावेळेस गद्दारीच्या शिक्यामुळे बाळासाहेब आज दिन कपाळी पुन्हा मतदार मुका लावतील अशी चर्चा आष्टी पडता शिरूर मतदार संघात आहे.

विधानसभा निवडणुकीला अवघे काही महिने उरले आहेत. या निवडणुकीची महायुती आणि महाविकास आघाडीसह राज्यातील इतर पक्षांनी जोरदार तयार केली आहे. महायुतीने तर सीट शेअरिंगबाबत प्राथमिक बोलणीही केली आहे. खुद्द राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याबाबतची माहिती दिली आहे. तसेच कोणत्या जागांवर अदलाबदली होणार आहे, याची माहितीही अजितदादांनी दिल्याने महायुतीतील आमदारांची चांगलीच डोकेदुखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## रक्षाबंधनापूर्वीच बहिणींना ओवाळणी!

# लाडकी बहीण योजनेचा हप्ता १७ ऑगस्टला मिळणार; एकदाच खात्यात 3 हजार पडणार

मुंबई /वृत्तसंस्था

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता १७ ऑगस्टलाच मिळणार आहे. याबाबत शासन दरबारी निर्णय झालेला असून १७ ऑगस्ट रोजी राज्य सरकारकडून भव्य दिव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून हे पैसे वितरीत केले जाणार आहेत. जे अर्ज पात्र झाले आहेत, अशा महिलांना ३ हजार रुपये बँक खात्यात जमा होणार आहे. त्यामुळे रक्षाबंधनापूर्वीच बहिणींना ओवाळणी मिळणार असल्याचे निश्चित झाले आहे.

प्रत्येक जिल्ह्यातून पालकमंत्री असणार

मिळालेल्या माहितीनुसार, आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात आला आहे. १७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या कार्यक्रमाला एकाच मंचावरती मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित असणार आहेत. तर, प्रत्येक जिल्ह्यामध्ये पालकमंत्री या कार्यक्रमातून उपस्थित राहून ऑनलाईन पद्धतीने महिलांच्या खात्यात पैसे जमा होणार आहे.

१७ ऑगस्टला दोन ते अडीच कोटी महिलांना पहिला हप्ता देण्याच्या संदर्भामध्ये राज्य सरकारचा विचार असल्याचीही माहिती आहे. मात्र, राज्य सरकारच्या या निर्णयामुळे योजनेसाठी पात्र झालेल्या महिला भगिनींना मोठा दिलासा मिळाला आहे.

(उर्वरीत पान २ वर)

### १ कोटी अर्जांची छानणी पूर्ण झाली

- तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर महिलांच्या आलेल्या अर्जांची आकडेवारी समोर येत आहेत. त्यामध्ये, महिला भगिनींचे मंजूर अर्ज, प्रलंबित अर्ज आणि नामंजूर अर्जही देण्यात येत आहेत. तर, प्रलिंबित अर्जांमधील काही त्रुटी दुरुस्त करुन ते मंजूर केले जाणार आहेत. तर, नामंजूर करण्यात आलेल्या अर्जांना पुन्हा नव्याने अर्ज भरण्यासाठी मुदत देण्यात आली आहे.



# गेवराई मतदार संघातून बदामराव पंडित हेच महाविकास आघाडीचे आमदार होतील -परशुराम जाधव

## शिवसैनिकांच्या उपस्थितीत भगवा सप्ताह संपन्न

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई विधानसभा मतदारसंघात गेल्या ३० वर्षापासून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित सामान्य जनतेमध्ये मिसळून त्यांची कामे करत आहेत. विकास कामासोबतच सामान्य माणसांची वैयक्तिक कामे केल्यानेच ते पुन्हा एकदा गेवराई विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे महाविकास आघाडीतील आमदार म्हणून विजय होतील असा ठाम विश्वास शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांनी व्यक्त केला आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रभर भगवा सप्ताह उपक्रम राबविण्यात येत आहे. दिनांक ७ ऑगस्ट २०२४ रोजी गेवराई येथे झालेल्या शिवसैनिकांच्या विराट मेळाव्यात जाधव बोलत होते. कार्यक्रमास माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, शिवसेना जिल्हा समन्वयक बाळासाहेब अंभुरे, जिल्हा समन्वयक युधाजित पंडित, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, महिला आघाडी जिल्हाप्रमुख संगीताताई चव्हाण, युवानेते रोहित पंडित, माजी सभापती अभयसिंह पंडित, युवानेते यशराज पंडित, ऍड एम एस इंदानी, माजी सभापती पंढरीनाथ लगड, बीड तालुकाप्रमुख गोरख सिंघम, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख शेख फर्जना, उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, तालुकाप्रमुख अजय दाभाडे किसान सेना तालुकाप्रमुख सतीश सपकाळ, युवासेना तालुकाप्रमुख गोविंद दाभाडे, शहर प्रमुख शेख शहेदाद, युवती सेनेच्या सिद्धेश्वरी कोकाटे, आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी माजी जि प सदस्य युवराज डोंगरे, माजी सभापती अभयसिंह पंडित, माजी तालुकाप्रमुख कालिदास नवले, युवासेना उपजिल्हाप्रमुख शेख सिराज, तय्यब पठाण, दत्ता राठोड, नारायण गाडे, संगीताताई चव्हाण, गणेश वरेकर यांची समायोजित भाषणे झाली.



यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, गेल्या ३० वर्षापासून गेवराई विधानसभा मतदारसंघात प्रत्येक व्यक्तीचे माझ्याकडे आलेले कोणतेही काम गट न पाहता मी केले आहे. तालुक्यातल्या सर्व जाती-धर्माच्या लोकांसोबत राहत असल्याने एकमेकांची सुखदुःख आम्हाला माहिती आहेत. त्यामुळेच गेवराई तालुक्यातील प्रत्येकाशी माझे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. या प्रेमावरच तीन वेळेस आमदार झालो. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या काळात केलेली सामान्य जनतेच्या हिताची कामे आणि ३० वर्षात मी केलेली सामाजिक आणि विकासाची कामे या बळावर पुन्हा एकदा गेवराई विधानसभा मतदारसंघावर यावेळी शिवसेनेचा भगवा फडकेल असा विश्वास बदामराव पंडित यांनी व्यक्त करून प्रत्येक शिवसैनिकाने घराघरात जाऊन प्रत्येक व्यक्तीची भेट घेऊन पक्षाचे मशाल चिन्ह त्यांच्यापर्यंत पोहोचवावे असे आवाहन केले.

जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव म्हणाले की, गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत काय झाले याचा विचार आता करत बसू नका. यावेळी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी कोणत्याही स्थितीत बदामराव पंडित यांना उमेदवारी देण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे त्यांना आमदार करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत. त्यांना नामदार करण्याची जबाबदारी शिवसेनेची आहे, असा विश्वास त्यांनी शिवसैनिकांना दिला. बीड जिल्ह्यात गेवराई तालुका हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे आणि तो या विधानसभेमध्ये बदामराव पंडित यांना आमदार करून महाराष्ट्राला दाखवून द्या असेही आवाहन जाधव यांनी केले.

शिवसैनिकांच्या या मेळाव्यास माजी जी प सदस्य शामराव राठोड, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, सुभाष छाजेड, अश्विनी कोकाटे, तुकाराम हराळे, संभाजीराव येवले, प्रशांत मोरे, हरिभाऊ गलधर, मुकुंद बाबर, गोविंद जोशी, धनेश्वर खेत्रे, रामजी बांड, बाबा फटांगडे, राम काळे, तुळशीराम गलधर, दीपक रडे, राजू चव्हाण ,इजहार शेठ, हरभट शेठ, शेख शामदभाई, सोपानराव जाधव, पवन चव्हाण, शेख इस्माईल, रोहिदास लोखंडे, साईनाथ सुतार, गणेश लाड, भैय्या नाईकवाडे, चंद्रसेन जाधव, अंकुश झिंगरे, भारत मडके, प्रकाश तळेकर, सिताराम गव्हाणे, मोहन चाळक, नितीन साबळे, राजेंद्र खिस्ते, मधुकर आहेर, अजय औटी, महादेव औटी, कैलास राठोड, कल्याण राऊत, विशाल थोरात, गणेश चव्हाण, शिवाजी मोघे, रमेश फलके, पिंटू गर्जे, सुभाष घाडगे, बिभीषण पवार, संभाजीराव आहेर, भास्करराव कचरे, बदाम पौळ, संभाजी नाटकर, संतराम काळे, बंडू आप्पा घोलप, नंदू गाडे, विष्णू सोनवणे, नासेर अत्तार, फत्ते मामू, उज्वल सुतार, अजित वर्मा, काशिनाथ आडगळे, शेख फिरोज, जगन्नाथ गीते, राम शिंदे, बाळासाहेब नागटिळक, कैलास शिंदे, वसंत निकम, मिलिंद वाघमारे, राजू जावळे, दादासाहेब संत, दत्ता खरात, दादासाहेब खरात, कॅप्टन गिरी, आदींसह शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. माजी सभापती पंढरीनाथ लगड यांनी सर्वांचे आभार मानले.

# कृषी पूरक साहित्याचे वितरण शेतकऱ्यांना ताबडतोब करावे - कृषिमंत्री धनंजय मुंडे यांचे निर्देश

## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी मंत्रालयात घेतला आढावा

मुंबई (प्रतिनिधी)

महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेले पॉवर स्प्रे पंप शेतकऱ्यांना तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावे, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील तसेच राज्यातील पूरबाधित क्षेत्रातील शेतकऱ्यांना पीक विमा योजनेत नुसानभरपाई देण्याच्या अनुषंगाने नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्यात यावे, तसेच विविध योजनांसाठी वितरित करण्यात आलेला निधी शेतकऱ्यांच्या खात्यात ताबडतोब वर्ग करण्यात यावा असे आदेश कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी आज दिले.

कृषी विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात आयोजित



बैठकीत कृषिमंत्री धनंजय मुंडे बोलत होते. या बैठकीस कृषी विभागाच्या अप्पर मुख्य सचिव श्रीमती व्ही राधा, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना प्रकल्प संचालक परिमल सिंह, बाळासाहेब ठाकरे ग्रामीण कृषी विकास प्रकल्प संचालक हेमंत वसेकर, कृषी संचालक विनायकुमार आवटे, सर्व विभागीय कृषी सहसंचालक, सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, प्रकल्प संचालक आत्मा व इतर अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत बोलताना कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी राज्यात ९९ टक्के पेरण्या पूर्ण झालेल्या असल्यामुळे शासनाच्या विविध योजनांचा माध्यमातून डीबीटी पोर्टल वर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना द्यावयाचे कृषी पूरक उपकरणे, निविष्ठा यांचे वितरण त्वरित करण्यात यावे. नॅनो युरिया, डीएपी, पावर स्प्रे पंप, स्टोरेज बॅग, मेटल दिहाईड आदी साहित्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात यावे, असे निर्देश दिले तसेच विविध योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या व प्रत्यक्ष शेतकऱ्यांना भासणाऱ्या अडचणींच्या बाबत आढावा घेण्यात आला.

# मार्टी कृती समितीच्या लढ्याला अखेर यश

### अल्पसंख्यांक समाजासाठी मार्टी या स्वायत्त संस्थेच्या स्थापनेचा राज्य सरकारचा निर्णय

शिरूरकासार (प्रतिनिधी)

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मौलाना आझाद अल्पसंख्यांक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (मार्टी) स्थापनेस मंजुरीचा निर्णय राज्य सरकाने घेतला आहे. अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या स्थापनेस मंजुरी मिळावी म्हणून अनेक दिवसांपासुन मार्टी कृती समितीच्या वतीने आंदोलने करण्यात आली होती. अखेर समितीच्या प्रयत्नाला यश आले असुन आनंदोत्सव सजरा करण्यात येत आहे. मार्टी संस्थेमुळे अल्पसंख्यांक समाजाच्या आर्थिक विकासाच्या मार्गाला चालना मिळणार आहे. समाजातील विद्यार्थ्यांना याचा विशेष लाभ मिळणार असून राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाचे मुस्लिम व इतर अल्पसंख्यांक समाजातुन स्वागत होत आहे. शासनाच्या बार्टी,सारथी,महाज्योती,तार्टी, अमृत या स्वायत्त संस्थेच्या धर्तीवर मार्टी ची स्थापना करण्यात आली आहे. या साठी माजी मंत्री सुरेश धस यांनीही विशेष प्रयत्न केले होते. मार्टी कृती समितीचे सय्यद नबील जमा,फयाजभाई शेख,ड. अझर पठाण आदींनी शासनाकडे पाठपुरावा केला होता.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मौलाना आझाद अल्पसंख्यांक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (मार्टी) स्थापनेस मंजुरीचा निर्णय राज्य सरकाने घेतला आहे.

# बीड एलसीबीची मोठी कारवाई गावठी पिक्चर बाळगणाऱ्या दोघांना अटक

## पेठ बीड व पाटोदा हद्दीत अवैधरित्या गावठी पिस्टल बाळगणारे दोन आरोपी विरुध्दचे स्थानिक गुन्हे शाखा, बीड ने कारवाई करुन दोन गावठी पिस्टल केल्या जप्त

बीड (प्रतिनिधी)

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक छ. संभाजीनगर परिक्षेत्र संभाजीनगर यांनी अवैध अग्निशस्त्र बाळगणारे इसमांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक बीड यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांना कारवाई करण्याचे आदेश देवून मार्गदर्शन केले आहे.

दिनांक ०६/०८/२०२४ रोजी बीड शहरातील बुंदेलपुरा मस्जीद मध्ये धारदार शस्त्राने वार करुन मारहाण झाल्याची घटना घडली होती. त्यातील आरोपी गुन्हा करून पळुन गेल्याची माहिती मिळाल्यामुळे पोउपनि सुतळे व त्यांची टिम यांना यातील पळुन गेलेल्या आरोपीची शोध घेणे व घर झडती घेणकामी पाठविले असता सदर घटनेमधील संशयीत आरोपी नामे अमनखान नासेरखान पठाण रा. खडकपुरा यांचे घरामध्ये अवैध गावठी पिस्टल असल्याची गुप्त बातमी स्था.गु.शा. पथकास मिळाली त्यावरुन श्री. उस्मान शेख, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी पोउपनि सुतळे यांचे पथकास योग्य मार्गदर्शन करुन कारवाई करण्याचे आदेश दिले. पोउपनि सुतळे यांचे पथकाने खडकपुरा येथील नमुद संशयीत आरोपीचे घराची झडती घेवून त्याचे राहत्या घरातुन एक गावठी पिस्टल कि. अं.३५०००/- रु ची पंचासमक्ष जप्त केली असून त्याचे विरुध्द पो. ठा. पेठ बीड गुरनं २०७/२०२४ कलम ३, २५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये दिनांक ०६/०८/२०२४ रोजी गुन्हा नोंद करुन उघडकीस आणला आहे.तसेच पोलीस उप निरीक्षक श्री. श्रीराम खटावकर हे पो.स्टे. पाटोदा हद्दीत आरोपी शोध कामी असतांना पथकास गुप्त बातमी मिळाली की, प्रतिक स्वामी रा. रायमोह यांचेकडे गावठी पिस्टल असल्याची माहिती मिळाली तेव्हा रायमोह येथे सापळा लावुन नमुद आरोपीस गावठी पिस्टल कि.अ.४००००/- रुची पकडुन त्याचे विरुध्द पो.स्टे. पाटोदा गुरनं २०६/२०२४ कलम ३,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये दिनांक ०७/०८/२०२४ रोजी गुन्हयाची नोंद करण्यात येवुन गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. नंदकुमार ठाकुर, पोलीस अधीक्षक बीड, मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक, बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा येथील पोनि श्री. उस्मान शेख, पोउपनि श्रीराम खटावकर, पोउपनि सुशांत सुतळे, पोह/रामदास तांदळे, सुशिला हजारे, पोह/मनोज वाघ, प्रसाद कदम, राजु पठाण, विकास वाघमारे, सोमनाथ गायकवाड, देविदास जमदाडे, पोशि/अर्जुन यादव, सचिन आंधळे, अश्विनकुमार सुरवसे, चालक अतुल हराळे व सुनिल राठोड यांनी केली आहे.

# केज-अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाचे आमदार व त्यांचे रिमोट एकनिष्ठतेपासून कोसोदूर

## कपडे बदलल्यासारखे पक्ष बदलतात - ॲड. शेख शफीक भाऊ

केज/अंबाजोगाई (प्रतिनिधी)

एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांचा बीड जिल्हा दौरा नुकताच आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्यादरम्यान केज-अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघात घेतलेल्या बैठकीत शफिक भाऊंनी वरील उद्गार काढले.

या बैठकीत जिल्हा मुख्य प्रवक्ते तथा अंबाजोगाई प्रभारी शेख रमीज सर, अंबेजोगाई शहराध्यक्ष हिफाजत पठाण, केज शहराध्यक्ष तालेब इनामदार, केज कार्याध्यक्ष शाकेर कुरैशी, अंबाजोगाई युवक शहराध्यक्ष फहीम शेख, नेकनुर सर्कल अध्यक्ष अन्वर हाशमी, केज चे सय्यद सोहेल, रईस शेख, सय्यद आजीम, शहेबाज शेख, फेरोज पठाण, तय्यब पठाण, रमजान पठाण, शेख खाजा, शफियोद्दीन इनामदार, नय्यर इनामदार, आझम बागवान, नाजेम शेख, समीर शेख, आमेर तंबोली, नेकनुर चे वाजेद भाई, वसीम भाई, आमेर भाई, सय्यद सलाम, सय्यद आदील, अजीम दादा, रमजान भाई यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केज-अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघातील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना शफिक भाऊ म्हणाले की, विधानसभा निवडणुका लवकरच होणार आहे. यासाठी पक्षाचे प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी खांद्याला खांदा लावून जनतेसह पक्षाची कामे करावीत. अडीअडचणी सोडवाव्यात. आगामी विधानसभा निवडणूक एमआयएम पक्ष संपूर्ण ताकदीनिशी लढणार आहे. याकरिता प्रत्येकाने तन-मन-धन झोकून काम करायचे आहे.




येथील विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार व त्यांचे रिमोट एकनिष्ठतेपासून कोसोदूर असून आजपर्यंतचा त्यांचा राजकीय प्रवास पाहता विरोधकांसह जनतेला ही लक्षात येते की ते स्वतःच्या फायद्यासाठी कपडे बदलल्यासारखे पक्ष बदलतात. कधी एका पक्षात तर कधी दुसऱ्या पक्षात. अशा कोलांटउड्या सातत्याने यांच्याकडून सुरू असतात. सध्या भाजपला अनुकूल वातावरण नसल्याचे पाहून यांनी पुन्हा एकदा उडी मारून दुसऱ्या पक्षात जाण्याचे ठरविले आहे. लवकरच ही बाब जनतेसमोर येणार आहे. असेही ड. शेख शफीक भाऊ म्हणाले. या मतदारसंघात गेल्या अनेक वर्षांपासून जनता मुंदडा कुटुंबीयांना साथ देत आहे. सध्या असलेल्या आमदार ताईंच्या सासू या मतदारसंघात अनेक वर्षे आमदार राहिल्या होत्या. त्यांच्यानंतर आता त्यांच्या सुनबाई येथे प्रतिनिधित्व करीत आहेत. त्यांना गेल्या पाच वर्षाच्या काळात मतदार संघासाठी, मतदार संघातील जनतेसाठी ठोस आणि भरीव असे कार्य करता आले नाही. मात्र गेल्या महिन्या-दोन महिन्यांपासून या आमदार ताई सातत्याने प्रसिद्धी माध्यमातून आपल्या रिमोट कंट्रोल द्वारे बातम्यांचा रतीब घालीत आहेत. म्हणजे केले काही नाही पण प्रसिद्धी माध्यमातून नुसता कालवाच सुरू आहे. असा टोमणाही शफिक भाऊंनी मारला. जनहिताची कामे फक्त एमआयएम पक्षच करू शकतो. आपला पक्ष मजबूत करण्यासह जनतेसाठी विकासाची कामे आपल्याला करायची आहेत. ही गोष्ट लक्षात घ्यावी आणि विधानसभा निवडणुकीसाठी तयारीला लागावे. जिथे कुठे पक्षश्रेष्ठींचे मार्गदर्शन हवे असेल तिथे सांगावे. मार्गदर्शन करण्यासाठी सर्व पक्षश्रेष्ठी आणि वरिष्ठ पदाधिकारी सदैव तत्पर व तयार आहेत. असेही शफिक भाऊंनी सांगितले. यामुळे तालुक्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साह व आत्मविश्वास संचारलेला पहावयास मिळाला. यावेळी बीडहून शफिक भाऊंसह आलेले युवक जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक शेख मतीन, ज्येष्ठ नेते अब्दुस्सलाम सेठ, जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली उर्फ लालु भैय्या, बीड शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, जिल्हा सहसचिव अन्वर पाशा, मराठवाडा सोशल मीडिया एडमिन शेख मुदस्सिर, सय्यद अब्दुस्सलाम, सय्यद आदील, सोहील मोमीन यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

# बीडमध्ये वीरशैव स्मशानभूमीत २ खोल्यांच्या बांधकामाचे भूमिपूजन

## डॉ.योगेश क्षीरसागर यांनी निधी उपलब्ध करून दिल्याने अनेक वर्षांचा प्रश्न मार्गी

बीड (प्रतिनिधी)

शहरातील वीरशैव समाजाच्या स्मशानभूमीमध्ये दोन खोल्यांच्या बांधकामाचे भूमिपूजन राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते मंगळवारी (दि.६) दुपारी ३ वाजता करण्यात आले. स्मशानभूमीमध्ये खोल्या उभारण्याची समाजाची मागणी होती. यासंदर्भात समाजाच्या शिष्टमंडळाने डॉ.क्षीरसागर यांची भेट घेऊन निधीची मागणी केली होती. क्षीरसागरांनीही समाजभावनेचा आदर करुन खोली बांधकामासाठी तत्काळ १० लाखांचा निधी उपलब्ध करुन दिला आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली.



शहरातील कंकालेश्वर मंदिराच्या मागील बाजूस वीरशैव लिंगायत समाजाची स्मशानभूमी आहे. स्मशानभूमीत अंतर्गत रस्ते, पाण्याची सुविधा, निवारा नसल्याने अंत्यविधीस येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पावसाळ्यात तर मोठे हाल होतात. केवळ स्मशानभूमीला कंपाऊंचे काम झालेले आहे. भौतिक सुविधांसोबतच स्मशानभूमीत दोन खोल्या उभारणे गरजेचे आहे. यामुळे वीरशैव लिंगायत वाणी समाजाचे अध्यक्ष रामेश्वरअप्पा कानडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांची भेट घेऊन स्मशानभूमीतील दुरवस्थेबाबत माहिती दिली. तसेच, दोन खोल्यांचे बांधकाम करण्याची मागणी केली होती. त्यानुसार डॉ.क्षीरसागर यांनी तत्काळ वीरशैव स्मशानभूमीत दोन खोल्यांचे बांधकाम सुरू करण्याचे नियोजन केले. या कामाचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वीरशैव लिंगायत वाणी समाजाचे अध्यक्ष रामेश्वरअप्पा कानडे, अशोक चिपाडे, शिवाप्पा भुरे, अशोक शहागडकर, बाळूशेट मिटकरी, अनिल मिटकरी, उत्तरेश्वर कानडे, नागेश मिटकरी, पशुपती मिटकरी, दिनेश राजमाने, अमर ढेपे, अनंत शहागडकर, अमोल होनराव, अमोल गलधर, ज्ञानेश्वर राऊत, साजेद जागीरदार, भारत शेटे, सुरेश कानडे, दिनेश राजमाने, शुभम कुलथे, दिलीप ढेपे, चंदू विभुते, अनंत शहागडकर, महारुद्र घेवारे, महेश डोंगरे, श्रीकृष्ण पताळे, सोमनाथ कानडे, सचिन रेगुडे, रवींद्र कानडे, बाळू स्वामी, योगेश बारस्कर, अमित कानडे, विद्याभूषण बेदरकर आदी उपस्थित होते.

# स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बंद यंत्रसामुग्री तात्काळ सुरु करा

## माजी आमदार पृथ्विराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांचे अधिष्ठाता यांना निवेदन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

ग्रामीण भागातील रूग्णसेवेला वरदान असलेल्या स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय रूग्णालयातील यंत्रसामुग्री ही मागील अनेक दिवसांपासून बंद आहे. तरी ती तात्काळ सुरू करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्विराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी यांना मंगळवार, दिनांक ६ ऑगस्ट रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्विराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाचे अधिष्ठाता यांना मंगळवारी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, अंबाजोगाई मध्ये गेल्या अनेक दिवसांपासून अनेक मशिन व यंत्रसामुग्री बंद आहेत. त्यामुळे रूग्णांचे बरेच हाल होत आहेत. यात १) एक्स-रे मशीन बंद आहे. ती ताबडतोब चालू करण्यात यावी., २) एँजीओग्राफी व एँजीओप्लास्टी हे मशिन तात्काळ सुरू करण्यात यावे., ३) प्रसुती विभागामध्ये (डिलेव्हरी विभाग) विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. प्रसुतीच्या वेळी महिलांना चांगली रूग्णसेवा मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी आहेत. तसेच बाळ जन्मल्यानंतर त्याची काळजी घेण्यासाठी डॉक्टरांची लक्ष देण्याची आवश्यकता आहे. याबाबत अनेक महिलांच्या तक्रारी आहेत. त्यामुळे तात्काळ या उपाय योजना करण्यात याव्यात., ४) अपघात विभागामध्ये सिएमओ वेळेवर पेशंन्ट पाहात नाहीत व सिनिअर डॉक्टर थांबत नाहीत., ५) आर्थोचे ऑपरेशन वेळेवर होत नाहीत. त्यामुळे रूग्णांचे हाल होत आहेत., ६) अनेक वॉर्डामध्ये पिण्याचे व शौचालयासाठी पाणी नसल्याबाबत अनेक रूग्णांच्या नातेवाईकांच्या तक्रारी आहेत., ७) रूग्णालयात सेवा देण्यासाठी मनुष्यबळ व डॉक्टर हे कागदोपत्री दाखवले जातात. परंतु प्रत्यक्ष रुग्णसेवेसाठी उपलब्ध नसतात. या सर्व मागण्यांचा विचार करून तात्काळ सर्व यंत्रसामुग्री सुरू करण्यात यावी. अन्यथा येणाऱ्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनाच्या प्रती माहितीस्तव राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री ना.हसनजी मुश्रीफ आणि राज्याचे कृषिमंत्री तथा बीडचे पालकमंत्री ना.धनंजयजी मुंडे यांना पाठविण्यात आल्या आहेत. सदरील निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्विराज साठे, तालुकाध्यक्ष अमर देशमुख, तानबा लांडगे, संजिवनीताई देशमुख, ॲड.शहाजहान खान, ॲड.मोहम्मद जफर, यशोधन लोमटे, नाना ढगे, व्यंकटेश चामनर, हमीद चौधरी, नामदेव गडदे, सुधाकर जोगदंड, अंकुश ढोबळे, इम्रान पठाण, शेख नबी मन्सूर, व्यंकटराव मुंडे, सलिम पिंजारी, शेख अकबर अली, ॲड.प्रशांत पवार, चंद्रकलाताई देशमुख, प्रेमलताताई लोदगे, रविंद्र मोरे, फारूख भाई, देविदास देवकते, धोंडिबा कुंडगर, सुभाष वडमारे, सुधाकर देशमुख, फैजान मिर्झा आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# श्री. जालंदर विद्यालयात वृक्षारोपण व अर्थदान कार्यक्रम संपन्न

## संस्था पदाधिकारी , प्राचार्य यांच्या उपस्थितीत

रायमोह (प्रतिनिधी)

प्रत्येक गावची शाळा म्हणजे त्या गावचे मानवी विकास केंद्र असतील तेथील सर्व समूह घटकांच्या मुलांच्या विकासाच्या वाटा शाळेतून निर्माण होत असतात. बाल्य अवस्था ते तारुण्य अवस्थेपर्यंत त्या बालकांची सर्व गुण संपन्नतेतून घडवणूक ही तेथील शाळेतून होत असते. आयुष्यातील प्रत्येक स्वप्नांना साकार करण्यासाठी चे बळ देण्याचे काम ही ती शाळाच करत असते . श्री.जालंदर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रायमोह या शाळेची स्थापना १९६३ झाली. आज तिला ६१ वर्ष पूर्ण होत आहेत.या शाळेतून अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन उच्च पदावर व व्यवसायातून भक्कमपणे स्वताच्या पायावर उभी असून आपल्या प्रगत जीवनाची वाटचाल करत असल्याचे दिसून येत आहे. ही शाळा शैक्षणिक दृष्ट्या रायमोह सह बारा वाड्यातील मुलांचे नेतृत्व करत आली आहे . येथे एकूण पाचवी ते बारावी पर्यंतचे वर्ग असून आर्ट सायन्स शाखेतून मुले शिक्षण घेत आहेत. सुसज्ज इमारत स्वच्छतागृह, , शुद्ध पाणी व्यवस्थापन व प्रयोग शाळेसह ही शाळा आज उत्तम सुस्थितीत भक्कम पणे उभी आहे . शाळा स्थापनेपासून आज या शाळेत तिसऱ्या टप्प्यातील शिक्षक येथे अध्यापनाचे काम करत आहेत. अनेक चढ उताराच्या टप्प्यातून



ही शाळा विकसित होत गेली आहे. एखाद्या झाडावर पक्षाने घरटे करावे व काही कालावधी साठी वास्तव्या करून नंतर ते घरटे तेथेच सोडून इतरत्र स्थलांतर करावे. मात्र त्या झाडावरील घरटे आहे त्याच स्थितीत असल्याचे दिसून येते . तद्वत श्री. जालंदर विद्यालयाचे घरटे आजही त्याच स्थितीत उभे रहात, रायमोह सह गावं परिसरातील मुलांसाठी अध्यापन अध्यायनाचे काम करत आहे. हे सत्य की,माणूस कितीही मोठा झाला. तरी तो स्वतः ज्या शाळेत शिकला त्या शाळेकडे त्याचा पाहण्याचा दृष्टिकोन खूप आशादायी, आपुलकीचा व गुडात्मक आकर्षणाचा असतो. ज्या शाळेने आपल्या पंखात बळ दिले. ज्या शाळेने आपल्या प्रगत जीवनाला कलाटणी दिली. त्या शाळेचे ऋण प्रत्येकाने आपल्या परीने फेडण्याचा प्रयत्न केला पाहिजे . श्रद्धा वान मंदिराच्या पावित्र्या पेक्षाही त्या त्या गांवच्या शाळेचे पावित्र्य शंभर पटीने अधिक असते. या सर्व बाबींचा विचार करता दिनांक ६ ऑगस्ट रोजी एका छोट्या खाणी कार्यक्रमातून संस्थेचे माजी सचिव मा. मुराद ( चाचा) पठाण विद्यमान सचिव मा. फारुख पठाण व शाळेचे संवेदनशील प्राचार्य मा.इस्माईल जैनूदिन शेख व पर्यवेक्षक जाधव के. बी.सर तसेच पालक वर्ग यांच्या प्रमुख उपस्थितीत शाळेचे शिक्षक तथा संपादक दिलीप तरकसे यांनी शाळा सुविधेसाठी रोख दहा हजाराची देणगी संस्था पदाधिकारी व प्राचार्य यांच्याकडे सुपूर्द करत नंतर त्यांच्याच हस्ते शाळा परीसरात वृक्ष रोपण करण्यात आले.

# शेतकऱ्यांना मंजूर केलेला पिक विमा, अग्रीम अनुदानातील उर्वरीत ७५ टक्के रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात तात्काळ जमा करा

## माजी आमदार पृथ्विराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांचे निवेदन

शेतकऱ्यांना मंजूर केलेला पिक विमा, अग्रीम अनुदानातील उर्वरीत ७५ टक्के रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात तात्काळ जमा करा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्विराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी उपजिल्हाधिकारी यांना मंगळवार, दिनांक ६ ऑगस्ट रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्विराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी उपजिल्हाधिकारी यांना मंगळवारी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, सध्या पाऊस खुप कमी झाल्यामुळे दुष्काळाचे सावट पडलेले असून, शेतकरी हवालदील झालेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना पिक विमा व अनुदान अग्रीम मंजूर केले होते. परंतु, त्यातील फक्त २५ टक्के रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली व उर्वरीत ७५ टक्के पिक विमा व अनुदान अद्यापही शेतकऱ्यांना मिळालेले नाही. तरी शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा विचार करून उर्वरीत ७५ टक्के पिक विमा व अनुदानाची रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी. अन्यथा येणाऱ्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्विराज साठे, तालुकाध्यक्ष अमर देशमुख, तानबा लांडगे, संजिवनीताई देशमुख, ॲड.शहाजहान खान, ॲड.मोहम्मद जफर, यशोधन लोमटे, नाना ढगे, व्यंकटेश चामनर, हमीद चौधरी, नामदेव गडदे, सुधाकर जोगदंड, अंकुश ढोबळे, इम्रान पठाण, शेख नबी मन्सूर, व्यंकटराव मुंडे, सलिम पिंजारी, शेख अकबर अली, ॲड.प्रशांत पवार, चंद्रकलाताई देशमुख, प्रेमलताताई लोदगे, रविंद्र मोरे, फारूख भाई, देविदास देवकते, धोंडिबा कुंडगर, सुभाष वडमारे, सुधाकर देशमुख, फैजान मिर्झा आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# तळणेवाडीत दिवसाढवळ्या अंगणवाडी सेविकेचे घर फोडले

## २० हजार रोख १ तोळ्याचे सोने चोरीला : ग्रामपंचायतने दिले पोलीस ठाण्यात निवेदन
## पोलीसांकडून पाहिजे ती मदत मिळेल ग्राम सुरक्षादलाची स्थपना करा - सपोनि प्रविण बांगर

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील सधन असलेले तळणेवाडी गाव गेल्या एक वर्षा पासुन चोरट्यानी टाग्रेट केले आसुन आता पर्यंत लहाण मोठ्या जवळ पास ३० ठिकाणी चोऱ्या झाल्याच्या घटना घडल्या आहेत त्या नोंदी गेवराई पोलीस ठाण्यात दाखल करण्यात होत्या त्यांचा आजून एकाही चोरीचा तपास लागला नसुन त्यामुळे चोरटे अधिकच निर्भिड पणाने अपला हात साफ करत आहे असाच प्रकार सोमवार दि ५ ऑगस्ट रोजी मुख्य रस्त्यावर घर असलेल्या अंगणवाडी सेविकाचे भर दिवसा ढवळ्या घराचे मेन गेट तोडून घरात निंवात कार्यक्रम करून २० हजार रू एक तोळ्या जवळ सोने नाने चोरी झाल्याची घटना तळणेवाडीत घडल्याने गावातील ग्रामस्था मध्ये भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहे



सहामहिण्या नंतर तीन नंतर एका महिन्यात हि घटना पुन्हा तळणेवाडीत एकाच रात्रीतुन दोन घरफोड साडेतीन लाखाचे सोने-नाणे चोरट्यांनी नेले एक लाखा जवळ रोख रक्कम घेऊन चोरटे पसार झाल्याची ताजी घटना असतांना पुन्हा हाच विषय याला आळा घालण्य साठी काही तरी उपाय असेलना आता ग्राम स्था मध्ये चौका चौकात बोलले जात आहे तळणेवाडी येथील उमर रीयाजोद्दिन काजी व संतोष पवार यांच्या घरात रात्रीच्या वेळेस घरी कोणी नसल्याचे पाहून चोरट्यांनी दोन्ही घरात असलेल्या रोख रक्कम व सोन्याच्या दांगीन्यावर हात साफ करण्यात चोरटे गुरू वार ९ रोजीच्या मध्ये रात्रीत झाले, यामध्ये चार लाख रुपयाचे सोने न नगदी रक्कम चोरट्यांनी पळविली आहे सदर घटनेची माहिती दिली होती काहीच झाले नाही दोन दिवस पोलीस आले शोध पथक श्वान आणले श्वान फक्त एक दोन जागेवर घुटमळले निघुन गेले

याच परीसरात मागील सहा महिन्या पुर्वी अश्याच प्रकारे तुकाराम नगर येथे घरी कोणी नसल्याचा फायदा घेत चोरी करण्यात चोरटे यशवशी झाले होते त्यांची माहिती गेवराई पोलीसात कळवली मात्र त्याचा तपास अजून पर्यंत लागला नाही तर हि घटना घडली असून या भितीने नागरिंकात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे नागरिकानी घाबरून जाऊ नये म्हणून पुढे अश्या घटना घडू नये म्हणून येथील सरपंच अविनाश धस यांनी त्यांच्या सहकार्या सोबत आज दि ६ मंगळवार रोजी गेवराई पोलीस ठाण्यात एक चाळीस नागरिंकाच्या खाक्षाऱ्या सह पोलीस निरिक्षी क प्रविण बांगर यांना लेखी निवेदन दिले की प्रमुख मागणी केली की तुमच्या वतीने पोलीसांन रात्रीतुन एक तरी गस्त घालवी अशि मागणी केली आहे

तळणेवाडी करांनो तुम्हाला पाहिजे ती मदत आमच्याकडून मिळेल पहिल्यांदा तुम्ही गावामध्ये महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवा आणि दुसरे म्हणजे तुमच्या गावांमध्ये ग्रामसुरक्षा दलाची स्थापना करा त्यांना आपण आयडेंटी कार्ड देऊ आणि त्यांच्या वतीने आपण या गोष्टीला आळा घालू आमचं सर्व तरी तुम्हाला सहकार्य राहील आमचे पोलीस कर्मचारी तुमच्या मदतीला वेळोवेळी राहतील आणि यापासून आपल्याला एक सुगाव लागेल जर तुम्हाला कोणावर काय संशय असेल तर त्याबाबत आम्हाला जरूर कळवा पोलीस प्रशासन तुम्हाला सहकार्य करेल

या कामासाठी पोलीस प्रशासनाचे सहकार्य राहीलच या उद्देशाने आम्ही गावकरी एक दहा नऊ तरुण एकत्र येऊन ग्राम सुरक्षा दलाची स्थापना करून आमच्या गावाचे रक्षण करण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध राहो याबाबतचे मी आज लेखी निवेदन तुम्हाला देण्यास येत असून इथून पुढे कसल्याही प्रकारची गावामध्ये कोणी अनोळखी व्यक्ती आल्यास त्याच्याकडून त्याचा आयडी प्रूफ घेऊन तो कोणत्या कामासाठी आला किती वेळ थांबलाय गावात कोणा कोणाला भेटला काय काय विकून गेलाय हे सगळं आमचे नवतरुण याची माहिती घेतील आणि या कामासाठी सदैव तत्पर राहतील अशी नियोजन आम्ही करू आणि रात्रीच्या वेळेस गावामध्ये व्यस्त घालण्यासाठी ते पण सहकार करण्याची जबाबदारी आमच्यावर राहील वेळोवेळी तुम्ही आमच्या संपर्कात राहतात या उद्देशाने हे काम करणार आहोतकाही ग्रामस्थांमधून वस्त्यांमधील ग्रामस्थांच्या वतीने सांगण्यात येत आहे ही रात्रीच्या अपरात्री ड्रोन फिरवले जात आहे या दोन विषय काही माहिती असेल तर प्रशासनाने आम्हाला कळवावे व ते ड्रोन कशाच्या आधारे आकाशात फिरतोय त्याला पोलीस प्रशासनाची काही परवानगी आहे का याबाबत माहिती घेऊन फिरणाऱ्या ड्रोन

# सरस्वती प्राथमिक विद्यालयातील सहा वर्षापासून विद्यार्थ्यांचे पोषण आहार शिक्षकांच्या घशात ?

## तीन महिन्यांपासून माहिती न दिल्याने;मुख्याध्यापक सह संबंधित शिक्षकांवर निलंबनाची कारवाई करण्याची शिक्षणमंत्र्यांनकडे पालकांची मागणी!

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

किल्ले धारूर शहरातील सरस्वती प्राथमिक विद्यालय शाळेत शासनाकडून मिळत असलेल्या पोषण आहारात सहा वर्षापासून विद्यार्थ्यांच्या तोंडचा घास संबंधित मुख्याध्यापक सह शिक्षकांच्या घशात जात असल्याची तक्रार शिक्षण मंत्र्याकडे सामाजिक कार्यकर्ते गुलाब गायकवाड यांच्यासह पालकांनी केली आहे.यामध्ये २०१९ ते २०२४ पर्यंत विद्यार्थ्यांना शासनाकडून जो पोषण आहार तसेच विविध योजना येतात या योजनेमध्ये संबंधित शाळेचे मुख्याध्यापक सह संबंधित शिक्षकांनी विद्यार्थ्यापर्यंत न पोहोचवता स्वतःच्या घशात घातल्याचा शिक्षण मंत्री यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते गुलाब गायकवाड यांनी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे. यामध्ये. अंडी,केळी,तांदूळ हे शासनातर्फे विद्यार्थ्यांना खाऊसाठी उपलब्ध केले जात आहे. तरी संबंधित मुख्याध्यापक यांनी सहा वर्षापासून विद्यार्थ्यांना पोषण आहार न देता, हा पोषण आहाराचा काळाबाजार केल्या असल्याचे बोलले जात आहे.तसेच यामध्ये शालेय अंगणात फेवर ब्लॉग



बसवणे, स्वच्छता, स्वच्छालय, पिण्यासाठी पाणी,यासह अनेक मागण्या निवेदनात मांडल्या आहेत, पावसाळ्यात शालेय अंगणात चिखल होत आहे व विद्यार्थ्यांना चिखलमय जागेत ऊभे राहून ,ये जा करावी लागत आहे, चिखल असल्यामुळे विद्यार्थ्यांचा पाय घसरून अपघात होऊ शकतो,अपघात झाल्यास जिम्मेदार कोण?असा प्रश्न उपस्थित होते आहे.तसेच स्वच्छता नसल्यामुळे विद्यार्थी सर्दी खोकला,तसेच विविध आजारांचे त्रस्त होऊ लागले आहेत यासह अनेक मागण्या शिक्षणमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे गुलाब आण्णा गायकवाड केली आहे.

### तीन महिन्यांपासून माहिती नाही.!

गुलाब गायकवाड यांनी सरस्वती प्राथमिक विद्यालय या शाळेतील विद्यार्थ्यांना शासनाकडून शालेय पोषण.तसेच विविध योजनेची माहिती मागितली होती,तीन महिने उलटले तरी माहीती न दिल्याने संबंधित अधिकारी, मुख्याध्यापक सह संबंधित शिक्षक यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

गुलाब गायकवाड सामाजिक कार्यकर्ते धारूर

# भगवा सप्ताह निमित्त,व शिवसेना जिल्हाप्रमुख,तालुकाप्रमुख यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप



किल्ले धारूर (प्रतिनिधी)

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या वतीने भगवा सप्ताह आयोजित करण्यात आला होता,व तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते व शिवसेना तालुकाप्रमुख बाबासाहेब सराफ यांच्या वाढदिवसानिमित्त संभाजीनगर

भागातील वडारवाडा शाळेमध्ये शालिय साहित्य वाटप करण्यात आले, व शिक्षकवृंद यांच्याकडून शिवसेना तालुकाप्रमुख बाबासाहेब सराफ यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या,व या कार्यक्रमाचे कौतुक करण्यात आले.यावेळी:- विनायक ढगे,बंडू बप्पा सावंत,बाबा तिबोले, ज्ञानेश्वर कदम, रोहित फावडे, रोहित फावडे, गुलाब गायकवाड,अमोल सिरसट, एकनाथ औताडे, गौरव चव्हाण,शिवाजी माने,मोनू सावंत,महादेव किर्दक, युवराज गायकवाड,यांच्या सह शिक्षकवृंद व शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

# मानवतावादी दृष्टिकोन ठेवून साहित्यिकांनी लिखाण करावे - प्रा.किरण सगर

शिरूर कासार (प्रतिनिधी)

गुरूदेव रविंद्रनाथ टागोर यांचे लिखाण चिंतनशीलतेतून प्रगट झालेले असल्याने आजही ते चिरंतन असून वर्तमानातील साहित्यिकांनीही एकांगीपणा टाळत समतोल आणि वास्तववादी साहित्य लिहीले तर समाजाच्या दृष्टीने ते हितावह असेल असे प्रतिपादन मराठवाडा साहित्य परिषद संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी उपाध्यक्ष प्रा.किरण सगर यांनी केले. एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य द्वारा आयोजित राज्यस्तरीय ऑनलाईन काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

गुरूदेव रविंद्रनाथ टागोर पुण्यतिथीनिमित्त दि.७ ऑगस्ट रोजी एकता फाउंडेशनने २३ व्या राज्यस्तरीय ऑनलाईन एकता काव्य संमेलनाचे आयोजन केले होते. या काव्य संमेलनाच्या उद्घाटक म्हणून जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या श्रीम.सुशिलाताई मोराळे होत्या. एकताचे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड, मार्गदर्शक प्रा.डॉ.भास्कर बडे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे यांची या संमेलनात प्रमुख उपस्थिती होती.यावेळी इंद्रकुमार झांजे (आष्टी) यांच्या 'कंदुरी' व 'वाट' या चिंतनशील रचनांनी रसिकांना अंतर्मुख केले. हबीब भंडारे (संभाजीनगर) यांच्या 'विद्रोहाचा ताशा' व 'दंगल जवळ आली आहे' या दर्जेदार कवितांनी उपस्थितांची दाद मिळवली. नामदेव कोळी (जळगाव) यांनी 'तो शेतमजूराचा पोरगा आहे' व 'सरकारी दवाखाना' या कवितांमधून सामाजिक वास्तवाला हात घातला. संतोष दौंडे (आहिल्यानगर) यांनी 'कोरडे हंगाम झेलताना' व 'आईला स्वप्न पडलं' या सर्वसामान्यांच्या विषयाला वाचा फोडणाऱ्या रचना सादर करून वाहवा मिळवली. सविता ढाकणे (गेवराई) यांच्या 'स्री म्हणजे खेळणे नव्हे' ही स्री-वादी रचना व 'जाता पंढरीशी' हा अभंग दाद मिळवून गेला. सोनाली बेळे (नांदेड) यांनी 'विश्वनिर्मात्यास' व 'कर्तव्यदक्ष पांथस्थ' या कविता पेश करत श्रोत्यांना खिळवून ठेवले. 'बापूजी आता तुम्ही हवे होते' ही बालाजी मक्तेदार (धाराशीव) यांची कविता सामाजिक परिस्थितीवर परखड भाष्य करणारी होती. उत्तराखंड राज्यातील ऋषीकेश येथून आनंद शिंदे या युवाकवीने सादर केलेली 'रहना है तो' ही रचना देशात घुसखोरी करून स्थानकांवर अन्याय करणाऱ्यांवर ताशेरे ओढणारी ठरली.एकता



फाउंडेशन महाराष्ट्र राज्य चे प्रदेश संघटक देवीदास शिंदे व प्रदेश युवक निमंत्रक इम्रान शेख यांच्या संकल्पनेतून संमेलनांचे आयोजन होत असून २३ व्या काव्य संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन लातूर येथील सुप्रसिद्ध साहित्यिक भारत सातपुते यांनी करत संमेलनाला उंचीवर नेऊन ठेवले. एकता फाउंडेशन परभणी जिल्हा उपाध्यक्षा श्रीम.मेघा नांदखेडकर यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक तर एकता फाउंडेशन परभणी महानगरीय अध्यक्षा श्रीम.शोभा घुंगरे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळेस एकताच्या केंद्रीय कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांसह, एकता फाउंडेशन पैठण तालुकाध्यक्ष शहादेव सुरासे, शिरूर तालुका युवा आघाडीचे सी.पी.पालवे, विद्यार्थी आघाडीचे कार्तिक कांबळे आणि राज्यभरातील अनेक कवी-कवयित्री उपस्थित होते.

# महसूल विभागाने दप्तर दिरंगाई थांबवून योजनांचा लाभ द्यावा

## संजय गांधी, श्रावणबाळ, आत्महत्याग्रस्त, दिव्यांग योजनेसाठी लाभार्थी प्रतीक्षेत

बीड (प्रतिनिधी)

महसूल विभागाच्या मार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांच्या संदर्भात विभागाकडून दप्तर दिरंगाई केली जात असून अनेक पात्र नागरीक लाभाच्या प्रतीक्षेत आहेत.अर्जप्रक्रिया आणि प्रस्ताव निकषपात्र असताना अनेक लाभार्थ्यांना विभागाच्या अनास्थेमुळे त्रास सहन करावा लागत असून यावर आ. संदिप क्षीरसागर यांनी तातडीने सर्व प्रकरणे निकाली काढून लाभार्थ्यांना, लाभ वितरित करा अशा सूचना दिल्या आहेत.

बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड आणि शिरूर का. तहसील अंतर्गत अनेक निकषपात्र नागरिकांनी संजय गांधी निराधार अनुदान योजना , श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या



कुटुंबासाठी असलेल्या विविध योजना, दिव्यांग बांधवांसाठीच्या योजना इत्यादी योजनांसाठी अर्ज व प्रस्ताव दाखल केलेले आहेत. परंतु महसूल विभाग आणि तहसील प्रशासनाच्या दिरंगाई आणि अनास्थेमुळे गेल्या अनेक दिवसांपासून हे प्रस्ताव प्रलंबित आहेत. यामुळे पात्र असलेल्या लाभार्त्यांना लाभापासून वंचित राहावा लागत आहे व विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे. हि बाब लक्षात घेता आ. संदीप क्षीरसागर यांनी यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करून संबंधित नागरिकांना लाभाचे वितरण करावे अशा सूचना बीड व शिरूर (का.) तहसीलदारांना दिल्या आहेत. तसेच याबाबत आ.क्षीरसागर यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्याकडेही पत्रव्यवहार केला आहे.

# दलित वस्तीमधील निधी इतरत्र वळविणाऱ्या नाईकवाडे, पटेलांचा जातीवादी चेहरा उघड!

## बहुजन रयत परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विनोद उर्फ दादा हातागळे यांची टीका

बीड (प्रतिनिधी)

**शहरातील प्रभाग क्रमांक ३ मधील दलित वस्त्यांच्या रस्त्यांची दयनीय अवस्था आहे. या भागात खऱ्या अर्थाने विकास करण्याची गरज असताना तेथील निधी इतरत्र वळविणाऱ्या माजी नगरसेवक अमर नाईकवाडे, फारुक पटेल यांचा खरा जातीवादी चेहरा जनतेसमोर आला आहे, अशी टीका बहुजन रयत परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विनोद उर्फ दादा हातागळे यांनी केली आहे.**



पत्रकात पुढे म्हटले आहे की, प्रभाग क्रमांक ३ मध्ये अनुसूचित जातीतील लोकांच्या घरासमोरील रस्ते अद्यापपर्यंत केलेले नाहीत. हनुमान नगर व पूरग्रस्त कॉलनी याठिकाणी दलित वस्ती असून तेथील रस्ते केले नाहीत. आतापर्यंत या रस्त्यावर गुडघ्याएवढे गवत आलेले आहे. गत वर्षी मी स्वतः स्वखर्चाने मुरूम टाकून रस्ते वाहतुकीयोग्य करून दिले आहेत. स्थानिक माजी नगरसेवक स्वतःच्या फायद्यासाठी फक्त आश्वासन देतात व दलित समाजाचा निधी इतरत्र वळवितात. असे झाल्यास या भागातील नागरिकांना सोबत घेऊन मोठे आंदोलन उभा केले जाईल. यानिमित्ताने नाईकवाडे, पटेल यांना विकास निधी इतरत्र वळवून दलित वस्त्या भकास करायच्या आहेत का? असा सवाल विनोद उर्फ दादा हातागळे यांनी उपस्थित केला आहे.

**निवडणुकीत समाज धडा शिकवेल!**

निधी इतरत्र वळविणाऱ्या माजी नगरसेवक अमर नाईकवाडे, फारुक पटेल यांना निवडणुकीत दलित समाज धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा बहुजन रयत परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विनोद उर्फ दादा हातागळे यांनी दिला आहे.

# केज तालुक्यातील विहीरी व गायगोठा रक्कम जमा करा !

## अन्यथा के.पं.स.समोर आत्मदहन करणार - रोहन गलांडे पाटील

केज/प्रतीनिधी

केज तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या माध्यमातून खोदलेल्या शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे सिंचन विहिर खोदण्यासाठीचे ४ लाख रुपये अनुदान व गायगोटा योजनेचे ७८ हजार अशा दोन्ही योजनेचे शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी व तात्काळ शासनाने द्यावी जर तात्काळ रक्कम देण्यात आली नाही तर केज पंचायत समिती समोर आत्मदहन करणार आहे असा इशारा शासनाला निवेदनाद्वारे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी दीला आहे या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या




माध्यमातून केज तालुक्यातील लाभार्थी शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे शासन कागदोपत्री प्रक्रिया ज्या लाभार्थांची पुर्ण झाली आहे व केज तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत ज्या लाभार्थ्यांनी मनरेगा जलसिंचन विहीर योजनेचे लाभार्थी आहेत लाभार्थांन कडील शासन प्रक्रिया पूर्ण झालेली आहे परंतु अद्याप पर्यंत लाभार्थ्यांना मनरेगा योजने अंतर्गत झालेल्या विहीरीचा ऐकहीं रुपये रक्कम देण्यात आलेली नाही चार - पाच महिने झाले केज तालुक्यातील विहीर लाभार्थी शेतकरी मनरेगा विहीर योजने अंतर्गत ४ लाख अनुदान मिळणार म्हणून व्याजाचे पैसे काढून विहीरीला खर्च करून विहीर खोदल्या आहेत परंतु शासना कडुन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खोदलेल्या विहीरीची ४ लाख रुपये रक्कमेतील ऐक रुपये शेतकऱ्यांच्या , लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेला नाही तरी शासनाने केज तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खोदलेल्या विहीरीचे ४ लाख अनुदान व गायगोठा योजनेचे ७८ हजार शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी,अनुदान शासन कागदोपत्री प्रीक्रीया तात्काळ पुर्ण करुन लाभार्थ्यांच्या बँक खात्यात तात्काळ जमा करावे अन्यथा अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील केज पंचायत समिती समोर आत्मदहन करण्याचा शासनाला इशारा रोहन गलांडे यांनी निवेदनाद्वारे दीला आहे.

जलसिंचन विहीर लाभार्थी यांची बीले पास होऊन दोन महीने झाले आहेत तरी शासनाकडून निधी आलेला नाही.ग्राम रोजगार सेवक संघटना केज तालुका सचिव अनिल घोडके.

## राज्यस्तरीय प्राध्यापक पात्रता(सेट)परीक्षेत स्वा.रा.ती.महाविद्यालयाचे यश

अंबाजोगाई ( प्रतिनिधी)

येथील यो.शि.संस्था संचलित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या एम.ए.राज्यशास्त्र, अर्थशास्त्र,इंग्रजी विषयाच्या विद्यार्थ्यांनी श्रीमती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एकोणचाळीसाव्या राज्य स्तरीय प्राध्यापक पात्रता परीक्षेत (सेट)भरीव यश संपादन केले आहे . स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या राज्य शास्त्र विभागात एम. एम.चे शिक्षण घेतलेल्या राहूल हजारे,बालू जाधव बालासाहेब आंधळे एम. ए.अर्थशास्त्र विषयाचा विद्यार्थी गणेश जाधव व इंग्रजी विषयाचा विद्यार्थी तेजस आगरकर यांनी प्राध्यापक पात्रता (सेट) परीक्षेत यश मिळवून महाविद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे. या यशाबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाळे,अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष जी.बी.व्यास,कार्यकारी उपाध्यक्ष ड.जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर. थारकर,महाविद्यालयीन पदाधिकारी रमेश सोनटक्के,प्रा.रमेश सोनवळकर,डॉ.शैलजा बरुरे,आकलोड,डी. डब्ल्यु.आर्य,डॉ.निलेश होदलूरकर यांच्यासह इतर प्राध्यापक,कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# गेवराईत ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

गेवराई । प्रतिनिधी


गेवराई : केंद्र व राज्य सरकारच्या सूचनेनुसार जेष्ठ नागरिकांना त्यांचे जीवन अधिक चांगले आनंदी जगता यावे, त्यांचे आरोग्य परिपूर्ण असावे यादृष्टीने विविध प्रकारचे निर्णय घेतले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून गेवराई तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांची शुक्रवार दि . १६ ऑगस्ट रोजी गेवराई येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात विविध प्रकारच्या आजारांची तपासणी करण्यात येणार आहे . सकाळी ९ .३० ते १२ .३० या कालावधीत विविध विषयांचे तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत तसेच विविध प्रकारच्या चाचण्याही निशुल्क पद्धतीने करण्यात येणार आहेत . या तपासणी शिबिराचा लाभ सर्वांना घेता यावा म्हणून जेष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ . सुरज कोठावळे यांची जेष्ठ नागरिक समन्वय समिती शिष्टमंडळाने जुलैमध्ये भेट घेऊन चर्चा केली होती . त्याचा परिणाम म्हणून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ज्येष्ठ नागरिकांची विशेष तपासणी उपजिल्हा रुग्णालयात निःशुल्क करण्यात येणार आहे . या अनुषंगाने गेवराई शहर व तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांनी आपले विविध आजाराचे रिपोर्ट सोबत घेऊन १६ ऑगस्ट रोजी रुग्णालयात सकाळी ९ .३० वाजता हजर राहावे आणि या तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जेष्ठ नागरिक तालुका समन्वय समितीचे अध्यक्ष प्रा. राजेंद्र बरकसे ,सचिव सखाराम कानगुडे, सदस्य एस.पी. सूर्यवंशी,श्रीमती शोभाताई चेडे, श्रीमती सीता महासाहेब, प्रा. संदीपान हिंगे, लक्ष्मणराव घाडगे आदींनी केले आहे आदींनी केले आहे.

# माजी मंत्री सुरेश धस यांच्या उपस्थितीत होणाऱ्या जागतिक आदिवासी गौरव दिन कार्यक्रमास उपस्थित रहा

## प्रदेशाध्यक्ष युवराज बर्डे यांचे आवाहन

आष्टी (प्रतिनिधी)

जागतिक आदिवासी गौरव दिनानिमित्त माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन एकलव्य सामाजिक व शैक्षणिक संस्था तथा आदिवासी युवक सामाजिक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष युवराज बर्डे यांनी केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे होणाऱ्या कार्यक्रमात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.नऊ ऑगस्ट शुक्रवार रोजी सकाळी साडेअकरा वाजता हा कार्यक्रम होणार आहे.माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी अविनाश पाठक. पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर.उपजिल्हाधिकारी कविता ठाकूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी निता अंधारे.तलाठी संघटनेचे जिल्हाध्यक्ष परमेश्वर राख यांची उपस्थिती राहणार आहे .प्रमुख वक्ते डॉ. आकाश पवार ( पोस्ट डॉक्टरेट आय.सी.एस.एस .आर.नवी दिल्ली यांची उपस्थिती लाभणार आहे यावेळी अनुसूचित जमातीच्या लाभारर्थ्यांना जात प्रमाणपत्र वाटप करणे दहावी आणि बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच आजी माजी शासकीय कर्मचारी आणि अधिकारी यांच्या सत्काराचा कार्यक्रम होणार आहे.आदिवासी नृत्याचे सादरीकरण करणार आहेत. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आदिवासी युवक सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष



युवराज बर्डे, कार्याध्यक्ष परमेश्वर पवार,सहसचिव विष्णु माळी, उपकार्याध्यक्ष महादेव नरवडे,बीड जिल्हाध्यक्ष गोरक पवार यांनी केले आहे.

# शासकीय व निमशासकीय तसेच खाजगी संस्थेत तंबाखू मुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत : डॉ. अशोक बडे

बीड (प्रतिनिधी)

शासकीय व निमशासकीय तसेच खाजगी संस्थेत पूर्णपणे तंबाखू मुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. अशोक बडे यांनी मंगळवारी झालेल्या बैठकीत केले.मंगळवारी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय मौखीक आरोग्य आणि राष्ट्रीय फलोरोसीस प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम बीड अंतर्गतची जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेत पार पडली. यावेळी जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. बडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ अति. जिल्हा शल्यचिकीत्सक, डॉ. नागेश चव्हाण उपस्थित होते.

डॉ. बडे पुढे म्हणाले, तंबाखू नियंत्रणातंर्गत कार्यक्रम जिल्हयात कडक पद्धतीने राबविणे गरजेचे आहे. यासाठी शासनाने कोटपा २००३ लागु असून याची अंमलबजावणी प्रभावीपणे केली गेली तर तरूण पिढी या व्यसनापासून बचावेल आणि भविष्य उज्वल होईल. यासह शासकीय, निमशासकीय आणि खाजगी शैक्षणिक संस्थेच्या परीसरात तंबाखू विक्रीस बंदी आहे. या भागात वांरवार जागृतीही करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

या बैठकीत राष्ट्रीय मौखीक आरोग्य कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या पीट अॅन्ड फिगर सिअलंट हा शालेय विद्यार्थ्यांना उपयोगी असणारा कार्यक्रम बीड येथील आदित्य दंत महाविद्यालय व रुग्णालय यांचा संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.




यासह मुख कर्करोग व मुख कर्करोग पुर्व आजाराचे निदान आता ग्रामिण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालय याठिकाणी देखील होणार आहे यामुळे निदान वेळेवर होऊन लवकरात लवकर उपचार चालु होतील, असे सांगण्यात आले. या बैठकीत राष्ट्रीय फलोरोसीस प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत फलोरोसीस बाधीत स्त्रोतांविषयी माहिती सांगून सदरील स्त्रोत तात्काळ बंद करण्यासंबंधीचे आदेश पारीत करण्यात आले. बीड जिल्हयातील जनतेला फलोरोसीस आजाराविषयी माहिती होण्याकरीता जनजागृती वाढविण्याचे आदेश जिल्हा आरोग्य आधिकारी डॉ. गंडाळ, यांनी दिले

यावेळी डॉ. महेश माने (जिल्हा क्षयरोग अधिकारी, बीड) डॉ. सिध्देश्वर फड (अधिष्ठाता स्वा. रा. तीर्थ वैद्यकिय महाविद्यालय 'अंबाजोगाई) डॉ. पी. के. पिंगळे (साथरोग वैद्यकिय अधिकारी), श्रीमती करुणा बडमारे (व.रा.स जिल्हा आरोग्य प्रयेगशाळा) जी.एम. खाडे (रासायनीक जी.एस.डि.ए. बीड) डॉ. एस. जी दवडगांवकर (दंत शल्यचिकीत्सक तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी (एनटीसीपी) जि.रु. बीड), श्रीमती अंजली निमस्कर (जिल्हा माहिती अधिकारी, बीड) जिल्हयातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी, डॉ. अभिजीत भालेकर (जिल्हा कार्यक्रम समन्वयक, एनसीडी), श्री. विशाल जाधव (एफएलसी, जि.रु.बीड) श्री. नागनाथ भडकुंबे (मानसशास्यश), श्री. सुरेश दामोधर (सामाजीक कार्यकर्ता), श्री. श्रीकांत उजगरे (दंत आरोग्य तज्ञ गि.रु. बीड) श्री. अविनाश महालींगे (प्रयोगशाळा तंत्रज्ञ) श्री. तत्वशील कांबळे (जेष्ठ सामाजीक कार्यकर्ता) उपस्थीत होते.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT